# महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

## अनुसूचीत जमातीची पदे भरण्याबाबतची खास जाहिरात.

---

**[१]** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रवर्गात व तेथे दर्शविलेल्या विभागात **अनुसूचीत जमातीची** पदे भरण्यासाठी पात्र अनुसूचीत जमातीच्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदे ही जिल्हास्तरीय असल्यामुळे ती भरण्याबाबत जिल्हा स्तरावरील नियुक्ती प्राधिकारी म्हणजे संबंधित राज्य परिवहन विभागाचे विभाग नियंत्रक यांनी जिल्हा स्तरावरील स्थानिक वृत्तपत्रात सर्व जाती प्रवर्गातील पदे भरण्याबाबत यापूर्वीच जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. त्या जाहिरातीत अनुसूचीत जमातीची जी पदांची संख्या दर्शविण्यात आली आहेत, तीच पदांची संख्या सदरच्या खास जाहिरातीत दर्शविण्यात आलेली आहे. उमेदवारांनी अर्ज सादर करण्यापूर्वी सदरची संपूर्ण जाहिरात, त्यात दिलेली माहिती, सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. आणि सर्व माहिती व प्रमाणपत्रासह परिपूर्ण अर्ज सादर करावा. अपूर्ण माहितीसह अर्ज केल्यास, तो बाद ठरविला जाईल व त्याबाबतची जबाबदारी महामंडळाची राहणार नाही.

भरावयाची प्रवर्ग निहाय पदसंख्या व ज्या विभागात भरती प्रक्रीया करण्यात येणार आहे व नेमणूक देण्यात येणार आहे ते विभाग व त्यांचा पत्ता खालील प्रमाणे आहे.उमेदवारांनी खालील पत्त्यावर त्यांचे अर्ज विहीत नमुन्यात भरुन दिनांक २६.१२.२००९ पर्यंत संबंधित कार्यालयास पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

| अ. क्र. | भरती व नेमणूकीचा विभाग . | चालक (कनिष्ठ) | वाहक (कनिष्ठ) | प्रमुख कारागिर (कनिष्ठ) | कारागिर ''क'' (कनिष्ठ) | सहाय्यक (कनिष्ठ) | सहाय्यक वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ) | उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाचा पत्ता. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | १८ | १८ | ०१ यांत्रिकी | ०२ यांत्रिकी/ विजतंत्री/ साठा जोडारी. | -- | ०१ | विभाग नियंत्रक,मुंबई म.रा.मा.प.महामंडळ, किरोल रोड,विद्याविहार (प), मुंबई - ४०० ०८६ |
| २ | रायगड | ३० | २३ | ०१ यांत्रिकी | ०२ यांत्रिकी | ०१ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, रायगड विभाग,पेण, मु.पो.ता.पेण (रामवाडी), ४०२१६० |
| ३ | ठाणे | १०१ | ८९ | -- | ०६ यांत्रिकी / लोहार. | १० | -- | विभाग नियंत्रक म.रा.मा.प.महामंडळ, वंदना सिनेमा समोर,पाचपाखाडी, ठाणे (प.),४०० ६०३ |
| ४ | रत्नागिरी | २५ | १७ | -- | ०२ यांत्रिकी/ विजतंत्री. | ०५ | -- | विभाग नियंत्रक म.रा.मा.प.महामंडळ, जुना माळ नाका, शिवाजीनगर, रत्नागिरी ४१५ ६१२ |
| ५ | पालघर | ९० | ५६ | ०१ यांत्रिकी | ०३ यांत्रिकी/ रंगारी/ विजतंत्री / साठा जोडारी. | ०२ | ०१ | विभाग नियंत्रक म.रा.मा.प.महामंडळ, गांधी नगर पूर्व,पालघर, जि.ठाणे,४०१ ४०४ |
| ६ | सिंधुदूर्ग | १५ | ११ | -- | ०१ यांत्रिकी | ०१ | ०१ | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, कणकवली,गडनदी जवळ, जि.सिंधुदूर्ग.४१६ ६०२ |

| अ. क्र. | भरती व नेमणूकीचा विभाग . | चालक (कनिष्ठ) | वाहक (कनिष्ठ) | प्रमुख कारागिर (कनिष्ठ) | कारागिर ''क'' (कनिष्ठ) | सहाय्यक (कनिष्ठ) | सहाय्यक वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ) | उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाचा पत्ता. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | धुळे | ४४ | ३९ | -- | ०४ यांत्रिकी/ विजतंत्री/ साठा जोडारी/ टायर फिटर. | -- | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, एस.आर.पी.रोड, जुन एस.आर.पी.कॅम्प समोर, धुळे ४२२ ००१ |
| ८ | अहमदनगर | -- | ०४ | ०१ यांत्रिकी | ०३ यांत्रिकी/ विजतंत्री. | ०१ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, कोटला रोड, सर्जेपुरा, अहमदनगर,४१४ ००१ |
| ९ | जळगांव | ०८ | ०९ | -- | -- | ०३ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, नवीन बसस्थानकासमोर, जळगांव ४२५ ००१ |
| १० | नाशिक | ०९ | -- | -- | -- | -- | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, एन.डी.पटेल रोड, शिंगाडा तलाव, नाशिक ४२२ ००१ |
| ११ | पुणे | ५० | २७ | -- | ०१ यांत्रिकी. | ०५ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, शंकरशेट रस्ता,सेव्हन लव्हज चौका जवळ, पुणे ४११ ०३७ |
| १२ | सांगली | ३८ | ४० | -- | ०१ यांत्रिकी. | ०२ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, शास्त्री चौक,सांगली-कोल्हापूर रस्ता, सांगली ४१६ ४१६ |
| १३ | सोलापूर | १० | २५ | -- | ०२ यांत्रिकी. | ०३ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, बुधवार पेठ, सोलापूर ४१३ ००२ |
| १४ | सातारा | २२ | १९ | -- | ०१ यांत्रिकी. | ०७ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, एस.टी.स्टॅन्ड जवळ, सातारा ४१५ ०११ |

| अ. क्र. | भरती व नेमणूकीचा विभाग . | चालक (कनिष्ठ) | वाहक (कनिष्ठ) | प्रमुख कारागिर (कनिष्ठ) | कारागिर ''क'' (कनिष्ठ) | सहाय्यक (कनिष्ठ) | सहाय्यक वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ) | उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाचा पत्ता. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | कोल्हापूर | ३६ | २९ | -- | ०१ यांत्रिकी. | ०३ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती बसस्थानकाजवळ, शाहुपुरी, कोल्हापूर ४१६ ००१ |
| १६ | बीड | १७ | १४ | -- | ०१ यांत्रिकी. | ०२ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, बसस्थानकाजवळ, बीड ४३१ १२२ |
| १७ | परभणी | १६ | ०९ | -- | -- | -- | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, गंगाखेड रोड, परभणी ४३१ ४०१ |
| १८ | उस्मानाबाद | १६ | २० | -- | -- | ०३ | ०१ | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, डॉ.आंबेडकर पुतळयाजवळ, उस्मानाबाद ४१३ ५०१ |
| १९ | औरंगाबाद | ०३ | ०२ | -- | -- | ०२ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, समर्थ नगर,सेवायोजन कार्यालयासमोर, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००१ |
| २० | जालना | १३ | १० | -- | -- | ०१ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, नवीन औद्योगिक वसाहत, एन. आर.बी. कंपनी समोर, औरंगाबाद रोड, जालना ४३१ २०३ |
| २१ | नांदेड | २१ | २२ | -- | -- | -- | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, असदुल्ला बाद,वर्कशॉप, नांदेड ४३१ ६०५ |
| २२ | लातूर | १६ | २१ | -- | -- | -- | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, अंबेजोगाई रोड,जुना रेणापूर नाका, लातूर ४१३ ५१२ |
| २३ | अमरावती | १९ | १९ | -- | ०१ यांत्रिकी. | -- | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, अमरावती विभाग, अमरावती ४४४ ६०१ |

| अ. क्र. | भरती व नेमणूकीचा विभाग . | चालक (कनिष्ठ) | वाहक (कनिष्ठ) | प्रमुख कारागिर (कनिष्ठ) | कारागिर ''क'' (कनिष्ठ) | सहाय्यक (कनिष्ठ) | सहाय्यक वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ) | उमेदवाराने अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाचा पत्ता. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | बुलढाणा | १९ | २५ | ०१ कतारी (टर्नर) | -- | -- | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, रा.प.विभागीय कार्यालय, मलकापूर रोड, बुलढाणा ४४३ ००१ |
| २५ | अकोला | १६ | १४ | -- | ०१ यांत्रिकी. | ०१ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, अकोला विभाग, अकोला ४४४ ००४ |
| २६ | यवतमाळ | ३९ | ७४ | ०१ यांत्रिकी | ०३ यांत्रिकी / विजतंत्री / साठा जोडारी टायर फिटर. | ०१ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, आर्वी रोड, यवतमाळ ४४५ ००१ |
| २७ | वर्धा | ०७ | ०९ | -- | ०१ टायर फिटर. | -- | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्तीबसस्थानकाजवळ, वर्धा ४४२ ००१ |
| २८ | भंडारा | १० | १४ | -- | ०१ यांत्रिकी. | ०१ | -- | विभाग नियंत्रक, म.रा.मा.प.महामंडळ, नागपूर रोड, नॅशनल हायवे क्र.६ वर, भंडारा ४४१ ९०४ |
| २९ | चंद्रपूर | २६ | ४१ | ०१ यांत्रिकी | ०२ यांत्रिकी. | -- | -- | विभाग नियंत्रक,मुंबई म.रा.मा.प.महामंडळ, दुर्गापूर रोड,तुकुम, चंद्रपूर ४४२ ४०१ |
| ३० | नागपूर | -- | ०४ | -- | ०१ यांत्रिकी. | ०१ | ०१ | विभाग नियंत्रक,मुंबई म.रा.मा.प.महामंडळ, रेल्वे स्टेशन जवळ, नागपूर ४४० ००१ |

## [२] उमेदवारांची निवड प्रक्रिया :--

उमेदवारांची निवड ही काटेकोरपणे गुणवत्तेनुसार करण्यात येईल. चालकांबाबत वाहन चालन चाचणी मध्ये मिळालेल्या गुणांना ७५ टक्के भारांक व इतर पदांसाठी विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या परीक्षेत मिळालेल्या गुणांना ७५ टक्के भारांक व सर्व पदांसाठी मुलाखतीमधील गुणांना २५ टक्के भारांक देऊन गुणानुक्रमे अंतिम निवड करण्यात येईल. मुलाखतीच्या २५ टक्के गुणांपैकी १५ गुण हे प्रत्येकी ५ पंसती गटांसाठी ठेवण्यात आले असून १० टक्के गुण हे तोंडी मुलाखतीसाठी आहेत. **पसंती गट पुढील प्रमाणे** :-- **१**) विद्यापिठ / राज्यस्तरीय किंवा त्यापेक्षा उच्च स्तरावरील खेळाडू **२**) विहीत शैक्षणिक अर्हतेपेक्षा उच्च शैक्षणिक अर्हता. **३**) रा.प.महामंडळ बस अपघातग्रस्त प्रवासी किंवा त्यांचे नातेवाईक. **४**) रा.प.महामंडळात शिकाऊ उमेदवारी केलेले उमेदवार. **५**) सेवानिवृत्त कर्मचारी किंवा १ वर्षात सेवानिवृत्त होणारे कर्मचारी यांचा मुलगा किंवा मुलगी प्रमुख कारागिर (कनिष्ठ) व कारागिर ''क'' (कनिष्ठ) या पदांसाठी मुलाखतीस पात्र ठरण्यापूर्वी उमेदवारांना संबंधीत पदाची व्यवसाय चाचणी उत्तीर्ण व्हावे लागेल.

**[३] उपरोक्त पदांसाठी विहीत केलेली वेतनश्रेणी / एकत्रित वेतन / शैक्षणिक अर्हता /अनुभव/ शारिरीक पात्रता / वयोमर्यादा इत्यादीचा तपशील खालील प्रमाणे**:--

## पदाचे नांव :- चालक (कनिष्ठ)

१) **वेतनश्रेणी :--** रु.२७९०-३८७०/- अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते, प्रतिवर्षी ३ टक्के दराने वार्षिक वेतनवाढ.

२) **शैक्षणिक अर्हता :--** अ) इयत्ता १०+२+३ या अभ्यासक्रमातील इयत्ता १० वी उत्तीर्ण.(एस.एस.सी.उत्तीर्ण )

ब) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आर.टी.ओ.) यांचेकडील अवजड वाहन चालविण्याचा मुदतीतील परवाना व पी.एस.व्ही.बॅज (बिल्ला ) आवश्यक.

३) **अनुभव :--** सर्व प्रकारची अवजड वाहने विशेषतः डिझेलवरील अवजड वाहन चालविण्याचा किमान ३ ते ५ वर्षाचा विना अपघात अनुभव असणे आवश्यक आहे. अवजड वाहन चालविण्याचा परवाना मिळाल्याच्या तारखेपासून पुढील ३ वर्षाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. त्या अगोदरच्या अनुभवाचा दाखला ग्राहय धरला जाणार नाही. अनुभवाचा दाखला सोबत दिलेल्या रा.प.विहीत नमुन्यातील असणे आवश्यक आहे.

४) **शारिरीक पात्रता :--** अ) ऊंची किमान १६० सें.मी.व कमाल १८० से.मी. ब) दृष्टी - चष्म्याविना ६ X ६ ( चष्म्याविरहीत दृष्टी ) असणे आवश्यक.

५) **वयोमर्यादा** :-- दिनांक २६.१२.२००९ रोजी उमेदवाराचे वय २४ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी जास्तीत जास्त ४० वर्षे. तसेच प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त / माजी सैनिक उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे.

## पदाचे नांव :- वाहक (कनिष्ठ)

१) **वेतनश्रेणी :--** रु. २४४०-३३८४.अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते. प्रतिवर्षी ३ टक्के दराने वार्षिक वेतनवाढ.

२) **शैक्षणिक अर्हता :--** अ) इयत्ता १० वी म्हणजे माध्यमिक शालांन्त परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण असणे आवश्यक. ब) मराठी भाषेमध्ये लिहिता व वाचता येणे आवश्यक. क) प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आर.टी.ओ.) प्राप्त केलेला वाहकाचा परवाना व बिल्ला आवश्यक. ड) जामीन देण्याचे सामर्थ्य असणे आवश्यक आहे.

३) **शारिरीक पात्रता :--** ऊंची किमान १५८ सें.मी. व कमाल १७८ सें.मी.असणे आवश्यक.( महिलांसाठी किमान ऊंची १४८ सें.मी.)

४) **वयोमर्यादा** :-- दिनांक २६.१२.२००९ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३५ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी जास्तीत जास्त ४० वर्षे, तसेच प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त माजी सैनिक उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे.

## पदाचे नांव :- सहाय्यक वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ)

१) **वेतनश्रेणी** :--रु. ५०५०/- एकत्रित [Fixed] प्रतिमहा वेतन, प्रतिवर्षी रु.१५२/- वार्षिक वाढ ५ वर्षे अनुज्ञेय. या कालावधीत इतर कोणतेही भत्ते दिले जाणार नाहीत.

२) **शैक्षणिक अर्हता** :-- अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा पदवीधर असणे आवश्यक.ब) कोणत्याही मार्ग परिवहन शिक्षण संस्थेचे प्रमाणपत्र (डिप्लोमा ) धारण करणा-यास पसंती. क) अवजड मोटार वाहन चालविण्याचे ज्ञान असल्यास पसंती. ड) तपासणीच्या स्वरुपाचे बाहेरील काम करण्याची क्षमता.

३) **शारिरीक पात्रता** :-- अ) ऊंची किमान १६३ सें.मी.( महिलांसाठी किमान ऊंची १५३ सें.मी.) ब) वजन किमान ४९ कि.ग्रॅम.( महिलांसाठी लागू नाही ) क) छाती न फुगविता ८४ सें.मी.(महिलांसाठी लागू नाही )

४) **वयोमर्यादा** : -- दिनांक २६.१२.२००९ रोजी १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी जास्तीत जास्त ३८ वर्षे. तसेच,प्रकल्पग्रस्त / भुंकपग्रस्त / माजी सैनिक उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे.

## पदाचे नांव :- सहाय्यक (कनिष्ठ)

१) **वेतनश्रेणी** :-- रु.२४४०-३३८४/- अधिक नियमानुसार मिळणारे भत्ते. प्रतिवर्षी ३ टक्के दराने वार्षिक वेतनवाढ.

२) **शैक्षणिक अर्हता** :-- उमेदवार औद्योगिक प्रशिक्षण संस्था ( आय.टी.आय.) चा पुढे नमुद केलेल्या १२ व्यवसायापैकी एका व्यवसायातील अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

३) **वयोमर्यादा** :-- दिनांक २६.१२.२००९ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीयांसाठी जास्तीत जास्त ३८ वर्षे. तसेच प्रकल्पग्रस्त / भुंकपग्रस्त / माजी सैनिक उमदेवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे.

४) **अनुभव** :-- मोटार कारखान्यातील ३ वर्षाचा अनुभव असल्यास पसंती.

## पदाचे नांव :- प्रमुख कारागिर (कनिष्ठ)

१) **वेतनश्रेणी** :-- रु.५७५०/- एकत्रित [Fixed] प्रतिमहा वेतन. प्रतिवर्षी रु.१७३/- वार्षिक वाढ ५ वर्षे अनुज्ञेय. या कालावधीत इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय नाहीत.

२) **शैक्षणिक अर्हता** :-- उमेदवार औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय) चा संबंधित व्यवसायातील अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच प्रमुख कारागिर (कनिष्ठ) पदासाठी संबंधित व्यवसायातील चाचणी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक.

३) **वयोमर्यादा** :-- दिनांक २६.१२.२००९ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम.) तसेच प्रकल्पग्रस्त / भुंकपग्रस्त / माजी सैनिक उमदेवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे.

४) **अनुभव** :-- अ) प्रमुख कारागिर (कनिष्ठ) यांत्रिकी करीता मोटार मेकॅनिक व्हेईकल व्यवसायातील (ट्रेड ) मधील किमान १० वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक. ब) अवजड वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे. क) कामगारांवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता. ड) प्रमुख कारागिर (कनिष्ठ),कतारी (टर्नर )साठी व्यवसायातील १० वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक आहे. कामगारावर नियंत्रण ठेवण्याची क्षमता.

..७..

## पदाचे नांव :- कारागिर ''क'' (कनिष्ठ)

१) **वेतनश्रेणी** :-- रु.५०५०/- एकत्रित [Fixed] प्रतिमहा वेतन. प्रतिवर्षी रु.१५२/- वार्षिक वाढ ५ वर्षे अनुज्ञेय. या कालावधीत इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय नाहीत.

२) **शैक्षणिक अर्हता** :-- उमेदवार औद्यागिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) चा संबंधित व्यवसायातील अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.लोहार व टायर फिटर या व्यवसायांकरीता सहाय्यक (कनिष्ठ) या पदासाठी जे पुढे नमुद केलेले १२ व्यवसाय निश्चित केलेले आहेत, त्यातील कोणत्याही एका व्यवसायातील आय.टी.आय.कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक. तसेच, कारागिर ''क'' (कनिष्ठ) पदासाठी व्यवसाय चाचणी उत्तीण होणे आवश्यक.

३) **वयोमर्यादा** :-- दिनांक २६.१२.२००९ रोजी उमेदवाराचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. ( मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम ) तसेच प्रकल्पग्रस्त / भुंकपग्रस्त / माजी सैनिक उमदेवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे.

४) **अनुभव** :-- अ) कारागिर ''क''(कनिष्ठ) यांत्रिक करीता मोटार मेकॅनिक व्यवसायातील ७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. ब) कारागिर ''क'' (कनिष्ठ) रंगारी करीता पेंटर व्यवसायातील ७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.क) कारागिर ''क'' (कनिष्ठ) साठा जोडारी करीता बॉडी फिटर /शीट मेटल व्यवसायामधील ७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. ड) कारागिर ''क'' (कनिष्ठ) विजतंत्री व्यवसाय करीता इलेक्ट्रीशियन / ऑटो इलेक्ट्रीशियन / वायरमन व्यवसायातील किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. इ) कारागिर ''क'' (कनिष्ठ) लोहार / टायर फिटर करीता संबंधित कामाचा ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच सुदृढ शरिरयष्टी आवश्यक आहे.

## [४] भरतीसंबंधी महत्वाची माहिती :--

१) **सहाय्यक (कनिष्ठ)** या पदासाठी खालील व्यवसाय (ट्रेड) विहीत करण्यात आले असून संबंधित विभागाच्या गरजेनुसार त्या त्या व्यवसायातील पदे भरण्यात येणार आहेत याची अर्जदारानी नोंद घ्यावी.

२) मोटार मेकॅनिक, २) शीट मेटल, ३) इलेक्ट्रीशियन / ऑटो इलेक्ट्रीशियन, ४) वायरमन ५) ब्लॅकस्मिथ, ६) टीनस्मिथ / वेल्डर, ७) पेन्टर, ८) यांत्रिकी उपकरण, ९) डिझेल मेकॅनिक १०) टर्नर ११) सुतार १२) यांत्रिकी (प्रशितन व वातानुकुलीकरण ) फक्त मुंबई / ठाणे व पुणे विभागाकरीता आवश्यकतेनुसार.

३) यापूर्वी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये संबंधित विभागात कार्यशाळा शिकाऊ उमेदवारी पूर्ण केलेल्या उमेदवारांकरीता सहाय्यक (कनिष्ठ) या प्रवर्गात संबंधित विभागाच्या एकूण पदाच्या संख्येच्या प्रमाणात ५० टक्के जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

४) संबंधित पदासाठी विहीत शैक्षणिक व इतर अर्हता व अटी पूर्ण करणा-या पात्र उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज हे, सदर उमेदवार ज्या विभागात अर्ज करणार आहेत तेथील विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, यांच्या पत्त्यावर अर्ज दिनांक २६.१२.२००९ पर्यत पोस्ट / कुरिअरद्वारे सादर करावेत. किंवा रविवार साप्ताहिक सुट्टी व इतर सुट्टीचे दिवस सोडून, सदर अर्ज त्या विभागात थेट स्विकारण्यात येतील . तसेच, या जाहिरातीमधील पदांकरीता संबंधित विभागांनी स्थानिक पातळीवर वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रदर्शित केली आहे. त्यामुळे त्या जाहिरातीच्या अनुषंगाने ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केले असतील त्यांनी या जाहिरातीच्या अनुषंगाने पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. सदर जाहिरातीमधील पदांमध्ये संबंधित विभागाच्या व पदांच्या संख्येच्या प्रमाणात समांतर आरक्षण खालील प्रमाणे राहील.

१) महिलांसाठी ३० टक्के, २) माजी सैनिक १५ टक्के, ३) प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त ५ टक्के, ४) फक्त खालील पदांसाठी अपंगांकरीता ३ टक्के आरक्षण, (अंध / अल्पदृष्टी,कर्णबधीर, अस्थिव्यंग प्रत्येकी १ टक्का )

५) <u>सदर जाहिरातीमधील खालील पदाकरीता अपंगांचे आरक्षण पुढील प्रमाणे</u> :---

१) <u>प्रमुख कारागिर (कनिष्ठ), २) कारागिर ''क'' (कनिष्ठ), ३) सहाय्यक (कनिष्ठ)</u> :--- अल्पदृष्टी(LV)-पात्र, कर्णबधीर (PD)-पात्र.

२) सहाय्यक वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ) - कर्णबधीर (PD)-पात्र, अस्थिव्यंग (OL, OA)- पात्र.

(LV - Low Vision (अल्पदृष्टी), (PD- Partially Deaf (कर्णबधीर), (OL-One leg affected, OA-One arm affected (अस्थिव्यंग).

**समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणाअंतर्गत कप्पीकृत असून ते त्या त्या सामाजिक आरक्षणाच्या गटातून भरण्यात येते. उपरोक्त समांतर आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे इतर उमेदवारांमधून भरण्यात येतील.**

६) रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केलेल्या शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यत दरमहा मानधनावर काम केलेल्या पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना १० टक्के समांतर आरक्षण लागू व उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

७) अर्ज विहीत नमुन्यात सर्वदृष्टीने पूर्ण असावेत. अर्जाचा नमुना सोबत देण्यात आला असून अर्जासंबंधी महत्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, सर्व विभागात एकाच दिवशी मुलाखती घेण्यात येणार असल्याने उमेदवारांनी एकापेक्षा अनेक विभागात अर्ज करु नयेत. उमेदवारांनी त्यांना सर्वात सोईच्या अशा एकाच विभागात अर्ज करावा, असे उमेदवारांना सूचीत करण्यात येत आहे.

८) सदर जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदामध्ये उमेदवारास कनिष्ठ वेतनश्रेणीत / एकत्र वेतनावर ५ वर्षे कालावधीसाठी नेमणूक देण्यात येईल.सदर कालावधी समाधानकारकपणे पूर्ण केल्यानंतर त्यांना नियमित वेतनश्रेणीत महामंडळाच्या नियम / अटींच्या अधीन सामावून घेण्यात येईल.याबाबत महामंडळामध्ये त्या त्या वेळी अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता अधिक इतर भत्ते इत्यादी अनुज्ञेय राहतील.

## [५] उमेदवारांनी सादर करावयाचा अर्जाचा नमुना.

## <u>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ</u>

-------------------------------------------पदासाठी अर्ज

**(अर्जातील अनुक्रमांक १ ते १९ येथील माहिती भरणे सर्व पदांसाठी आवश्यक आहे. उमेदवार ज्या पदासाठी अर्ज करणार आहे, त्या पदासाठी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अर्हतेप्रमाणे अनुक्रमांक २० ते २४ यापैकी लागू असेल, तेवढीच माहिती भरावयाची आहे. तसेच जेथे दाखला जोडावा, असे नमूद केले आहे तेथे मूळ दाखल्याची प्रमाणित केलेली छायांकित प्रत जोडावी)**

**प्रति**
---------------------------------
---------------------------------
---------------------------------

| |
|---|
| अलिकडेच काढलेला पासपोर्ट साईजचा स्वतःचा फोटो चिकटवून सही करणे |

**माझी माहिती मी खालीलप्रमाणे सादर करीत आहे :---**

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे संपूर्ण नाव **(प्रथम आडनांव)** | श्री/श्रीमती/कुमारी---------------------------------------------------------- |
| २ | वैवाहीक स्थिती | विवाहीत / अविवाहीत ------------------------------------- |
| ३ | वडीलांचे पूर्ण नांव (पुरुष व अविवाहीत महिला उमेदवांरासाठी)<br>पतीचे नाव (विवाहीत महिला उमेदवारांसाठी) | ----------------------------------------------------------------- |

| | | |
|---|---|---|
| ४ | उमेदवाराचा सध्याचा पूर्ण पत्ता.<br>( पत्र व्यवहारासाठी ) | ------------------------------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------------------------------<br>------------------------पिन-------------------------------- |
| | उमेदवाराचा कायमस्वरुपी पत्ता (कार्यालयीन दप्तरासाठी) | ------------------------------------------------------------------------------------<br>------------------------------------------------------------------------------------<br>------------------------पिन-------------------------------- |
| ५ | जन्मतारीख (शाळा सोडल्याचा दाखला जोडावा.) | तारीख---------- महिना ------------ वर्ष ---------------- |
| ६ | अ)उमेदवाराचा जातीचा प्रवर्ग | मागासवर्ग / खुला |
| | ब) मागासवर्गीयांच्याबाबत उमेदवाराची जात (दाखला जोडावा) | अनु.जात /अनु.जमात/विजाभज(अ,ब,क,ड)/ विमाप्र/इमाव-----------<br>पोटजात ----------------------- |
| ७ | जातीचे वैधता प्रमाणपत्र (मागासवर्गीयांच्या बाबत) (असल्यास दाखला जोडावा) | आहे -------------- नाही--------------- |
| ८ | उमेदवाराची मातृभाषा. | ---------------------------------------- |

९ शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाचा तपशील (सोबत दाखले जोडावे)

| शाळेचे / बोर्डाचे / महाविद्यालयाचे/ विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण परिक्षा | टिप : परीक्षेमध्ये मिळालेले गुण अर्जामध्ये नमूद करु नयेत. मात्र विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत सिलबंद लखोटयात स्वतंत्रपणे अर्जासोबत जोडण्यात यावी. |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

| | | |
|---|---|---|
| १० | शैक्षणिक अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर क्षेत्रातील कार्य / Extra Curricular Activities (दाखला जोडणे) | |

**११ भरती प्रक्रिया शुल्काचा तपशील**

| बँकेचे/पोस्टाचे नांव | कोणाच्या नांवे काढले | डी.डी. क्रमांक व दिनांक<br>पोस्टल ऑर्डर क्रमांक व दिनांक | MICR No. | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| | M.S.R.T.C.Fund A/c. | | | |

**१२ पूर्वीच्या नोकरीतील अनुभवाचा तपशील { चालक(कनिष्ठ) पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी मालकाच्या नांवासोबत त्याचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, चालविलेल्या वाहनाचा प्रकार व नोंदणी क्रमांक, अनुभवाचा कालावधी पासून व पर्यंत या दोन्ही तारखांसह इत्यादीचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे }** दाखला जोडावा - अनुभवाचा दाखला सदर जाहिरातील दर्शविलेल्या नमुन्यामध्ये असणे आवश्यक आहे.

| नियोक्त्याचे नाव | धारण कलेले पद | पासून | पर्यंत | नोकरी सोडण्याची कारणे |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| १३ | उमेदवार अपंग असल्यास<br>(विहीत नमुन्यातील दाखला जोडावा.) | अपंगत्वाचा प्रकार.-----------------------------------<br>अंपगत्वाची टक्केवारी. -------------- |
| १४ | समांतर आरक्षणाच्या गटात मोडत असल्यास गटाचा उल्लेख करावा. | महिला /माजी सैनिक/ प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त, शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन उमेदवार यापैकी -----------------------------<br>(माजी सैनिक/ प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त /अंशकालीन उमेदवार यांनी दाखला जोडणे आवश्यक आहे ) |
| १५ | उमेदवार पुढील विशेष प्राधान्य गटात मोडत असल्यास, तो गट नमूद करावा / अधोरेखित करावा. (दाखला जोडावा) | • विद्यापीठ/राज्यस्तरीय किंवा त्यापेक्षा जास्त स्तरावरील खेळाडू(दाखला जोडणे)<br>• विहीत अर्हतेपेक्षा जास्त शिक्षण<br>• रा.प.महामंडळ बस अपघातग्रस्त प्रवासी किंवा त्याचे नातेवाईक<br>• रा.प.महामडळात शिकाऊ उमेदवारी केली आहे<br>• सेवानिवृत्त कर्मचारी किंवा एक वर्षात सेवानिवृत्त होणारे कर्मचारी यांचा मुलगा /मुलगी |

| | | |
|---|---|---|
| १६ | उमेदवाराने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये कोणत्याही पदासाठी यापूर्वी किंवा आता दुस-या कोणत्याही पदासाठी अर्ज केला होता /आहे काय ? | मुलाखतीचे पद. ------------------------<br>मुलाखतीचे ठिकाण -----------------------मुलाखतीचा दिनांक ---------------------<br>निवड झाली अथवा नाही. ------------------------------ |
| १७ | उमेदवाराच्या कुटुंबातील कोणी व्यक्ती म.रा.मा.प.महामंडळात तात्पुरती/ नियमित /मानसेवी नोकरीमध्ये आहे काय ? | नांव -------------------------------------------------------------------<br>पद -----------------------------------ठिकाण -------------------------------<br>रुजू दिनांक ----------------------------------------------------------- |
| १८ | उमेदवाराविरुध्द न्यायालयीन प्रकरण / पोलीस चौकशी प्रलंबित किंवा प्रस्तावित आहे काय ? तपशील द्यावा. | |
| १९ | उमेदवार सध्या शासकीय सेवेत असल्यास नियुक्ती प्राधिका-याचे **''ना हरकत प्रमाणपत्र'' जोडावे** | शासकीय कार्यालयाचे नांव व पत्ता. |

| | | |
|---|---|---|
| २० | अर्ज केलेल्या पदासाठी आवश्यक असे कोणतेही प्रशिक्षण मिळविले आहे काय? (दाखला जोडावा) | संस्थेचे नांव ------------------------------------------------<br>प्रशिक्षणाचा कालावधी ------------------------------------- |
| २१ | चालक(कनिष्ठ) पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी द्यावयाचा तपशील. | अवजड वाहन परवाना क्र.-------------- दिनांक ----------<br>परवान्याची वैधता मुदत -------------------- (झेरॉक्स प्रत जोडावी) |
| २२ | चालक(कनिष्ठ) पदासाठी अर्ज करणा-या उमेदवाराकडे सार्वजनिक वाहन चालविण्याचा बिल्ला आहे काय? | बिल्ला क्रमांक ------------ दिनांक -----------------<br>वैधता मुदत -----------------(झेरॉक्स प्रत जोडावी) |
| २३ | वाहक पदासाठी अर्ज केला असल्यास | वाहकाचा परवाना व बिल्ला क्रमांक ------------दि. ----------- वैधता मुदत -------------------------------(झेरॉक्स प्रत जोडावी) |
| २४ | ऊंची व वजन | ऊंची --------------- सें.मी. / वजन ---------- कि.ग्रॅ. |

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की जाहिरातीमधील सूचना मी काळजीपूर्वक वाचल्या आहेत. तसेच अर्जामधील माहिती जाणीवपूर्वक व विश्वासपूर्वक दिली आहे व ती खरी आहे. यापैकी कोणतीही माहिती भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नेमणूक दिल्यानंतर खोटी असल्याचे आढळल्यास माझा अर्ज फेटाळून लावण्यास, माझी उमेदवारी रद्द करण्यास किंवा सेवेतून कमी करण्यास आणि / किंवा अन्य कायदेशीर कारवाईस मी मात्र राहीन, याची मी जाणीवपूर्वक नोंद घेतली आहे.

ठिकाण--------------------------

दिनांक -------------------------

**उमेदवाराची सही**

## [६] चालक (क) पदासाठी अनुभवाच्या दाखल्याचा नमुना

दाखला

स्थळ :- दिनांक :-

१) मी श्री./श्रीमती :---------------------------------------------------------------------------

( अवजड वाहन मालकाचे संपूर्ण नांव )

मु.पो.--------------- तालुका------------- जिल्हा-----------------

राज्य------------------- पिन कोड क्र.----------------- प्रमाणित करतो/करते की,

श्री.------------------------------------------------------- (चालक उमेदवाराचे संपूर्ण नाव)

राहणार --------------- तालुका ------------- जिल्हा------------ पिन कोड क्र.-------------

हे माझ्या स्वत:च्या मालकीच्या अवजड (माल वाहतुक ट्रकवर ) वाहन क्रमांक------------- वर (हेवी लायसन्स नंतरची तारीख ) दिनांक --------------- ते दिनांक --------------- पर्यंत एकूण-----वर्षे-----महिने इतक्या कालावधीमध्ये सुरक्षित वाहन चालविणारे चालक म्हणून काम करीत होते/आहेत. त्याबाबतची त्यांची माहिती खालील प्रमाणे :-

२) १) लायसन्स क्रमांक --------------------------------

२) लायसन्स मिळाल्याची दिनांक ---------------------

३)लायसन्स देणारे आर.टी.ओ.ऑफिस ---------------

४) अवजड वाहन चालविण्याचा परवाना मिळाल्याची तारीख --------------

५) परवाना नुतनीकरणाची तारीख---------------------

६) बॅज नंबर (बिल्ला क्रमांक )-----------------------

७) माझ्याकडे काम करीत असलेल्या कालावधीत त्यांचे हातून झालेल्या अपघातासंबंधीचा तपशील

अ) अपघात कधी झाला तारीख ----------------

ब) अपघाताचे स्वरुप -----------------

क) प्राणांतिक------------------------

ड) गंभीर---------------------------

इ) किरकोळ-------------------------

ई) अपघाताचे कारण-------------------

फ) त्याला अपघातासाठी जबाबदार धरण्यात आले होते काय ?------------

३) माझ्याकडे चालकाचे काम करीत असतांना त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचा नैतीक अध:पतनाचा गुन्हा घडलेला नाही. तसेच त्यास मद्यपानाचे वा अंमली पदार्थाचे सेवन करण्याचे कोणतेही व्यसन असल्याचे आढळून आलेले नाही. (असल्यास त्याप्रमाणे स्पष्ट नमूद करावे.)

प्रमाणित करतो की, मी उपरोक्त माहिती पडताळणी व शहानिशा करुन सदरच्या उमेदवाराचा प्रवासी वाहतुकीच्या सेवेत चालक पदासाठी अनुभवाचा दाखला देत आहे.

(उमेदवाराची स्वाक्षरी व तारीख )

(अवजड वाहन मालकाची स्वाक्षरी व तारीख रबरी शिक्का मारणे)

४) राजपत्रित अधिकारी/ लोकप्रतिनिधीची शिफारस

चालक पदासाठीचे वर नमुद केलेले उमेदवार व अवजड वाहन चालविण्याबाबत दाखला देणारे मालक या दोघानाही मी स्वत: ओळखत असल्यामुळे सदरच्या अनुभव दाखल्याची शिफारस करीत आहे.

(राजपत्रित अधिकारी/लोकप्रतिनिधीची स्वाक्षरी व तारीख)

----------

(नांव व हुद्दा)

राहणार -----------

तालुका ----------

जिल्हा------------

(खासदार, आमदार, जिल्हा परिषद/नगर परिषद - अध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, राजपत्रित अधिकारी यापैकी कोणाही एकाची शिफारस चालेल.)

## [७] उमेदवारांना महत्वाच्या सूचना :

१. पदांच्या उपलब्धतेनुसार आणि आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील.

२. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदांची संख्या बदलण्यासापेक्ष आहेत.

३. अर्ज विहीत नमुन्यात सर्वदृष्टीने पूर्ण असावेत,अर्जाचा नमुना पुढे देण्यात आला आहे. चालक (कनिष्ठ) पदासाठी अवजड वाहने विशेषतः डिझेलवरील अवजड वाहन चालविण्याचा किमान ३ ते ५ वर्षाचा विना अपघात अनुभव असणे आवश्यक आहे. अवजड वाहन चालविण्याचा परवाना मिळाल्याच्या तारखेपासून पुढील ३ वर्षाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल. त्या अगोदरच्या अनुभवाचा दाखला ग्राहय धरला जाणार नाही. अनुभवाचा दाखला सोबत दिलेल्या रा.प.विहीत नमुन्यामध्ये असणे आवश्यक आहे. अपूर्ण माहिती दिली असल्यास किंवा आवश्यक ते प्रमाणित दाखले जोडले नसल्यास अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**४.** शासकीय,निमशासकीय,शासकीय उपक्रम तसेच रा.प.महामंडळाच्यासेवेत असलेल्या एखाद्या अर्जदाराला वर नमूद केलेल्या पदांकरीता अर्ज करावयाचा असेल,तर त्याने /तिने त्यांच्या / तिच्या खात्यामार्फत विहीत मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.**(रा.प.महामंडळातील कर्मचा-याची निवड व नेमणूक झाल्यास त्याचे रा.प.नियमानुसार वेतन संरक्षित करण्यात येईल.)**

५. अलीकडच्या काळात काढलेले पारपत्र (पासपोर्ट) आकारातील स्वतःचे छायाचित्र स्वतःच्या स्वाक्षरीसह अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी चिकटवावे. याच छायाचित्रांच्या दोन अतिरिक्त प्रती पुढील निवड प्रक्रियेसाठी स्वतःजवळ ठेवणे आवश्यक आहे.

६. अर्जासाठी वापरण्यात येणारे कागद चांगल्या प्रतीचे (छायांकित/झेरॉक्स प्रतीसाठी वापरण्यात येणारे) **२१ सें.मी. X ३२ सें.मी.आकाराचे असावेत. पाकीटावर ठळक अक्षरात अर्ज केल्याचे पद नमूद करण्यात यावे.**

७. पत्र-व्यवहाराचा पत्ता आणि कायमस्वरुपी पत्ता सुस्पष्ट व पोष्टाच्या पिनकोडसह व्यवस्थित असावा.

८. उमेदवाराने अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला,शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका ( गुणपत्रिकेची साक्षांकित प्रत अर्जासोबत सिलबंद लखोटयात जोडावी), शिकाऊ उमेदवारी, अवजड वाहन परवाना, प्रवासी वाहन बिल्ला, वाहक परवाना व बिल्ला, अनुभव,अपंगत्व ,समांतर आरक्षणासंबंधी, विशेष प्राधान्य गटात मोडत असल्याचे, शासकीय सेवेतील उमेदवाराने नियुक्ती प्राधिका-याचे ना हरकत प्रमाणपत्र, तसेच मागासवर्गीयांनी जाती प्रमाणपत्र व जाती प्रमाणपत्राच्या वैधता इत्यादी **जे जे उमेदवारास लागू होते त्या दाखल्यांच्या साक्षांकित प्रती ( Attested copies )** जोडणे आवश्यक आहे.

९. उमेदवाराने स्वतः अथवा टपालाद्वारे अर्ज पाठवावा. टपालाद्वारे पाठविलेले अर्ज विहित मुदतीत वर नमूद केलेल्या पत्त्यावर प्राप्त झाले नाहीत किंवा उशिरा प्राप्त झाले तर, असे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. पोस्टाच्या विलंबामुळे कोणतीही माहिती प्राप्त होण्यास किंवा कळविण्यास विलंब झाला,तर त्याची जबाबदारी रा.प.महामंडळावर राहणार नाही.

१०. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे /कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास, त्याची / तिची उमेदवारी रद्द करण्यात येईल . तसेच नियुक्ती झाली असल्यास, कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल..

११. अनुसूचित जमातीच्या उमेदवाराने भरती प्रक्रिया शुल्क रु.५०/- **"महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ" / M.S.R.T.C.Fund A/c** यांच्या नांवे काढलेला व ज्या विभागात अर्ज केला आहे त्या विभागाच्या जिल्हा स्तरावरील बॅकेत अधिदानीत होणारा राष्ट्रीयकृत बॅकेचा किंवा सहकारी बॅकेचा **डिमांड ड्राफ्ट** अथवा वरील रक्कमेची **इंडियन पोस्टल ऑर्डर** अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. भरतीप्रक्रीया शुल्क इतर कोणत्याही स्वरुपात स्विकारला जाणार नाही.डिमांड ड्राफ्टच्या मागे उमेदवाराने त्याचे नांव,पत्ता आणि पदाचे नाव ठळक अक्षरात लिहिणे अत्यंत आवश्यक आहे. उमेदवाराने पाठविलेले भरतीप्रक्रीया शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

१२. उमेदवारास एका पेक्षा जास्त पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास, प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज देणे व स्वतंत्र भरती प्रक्रीया शुल्क भरणे आवश्यक आहे. (रु.५०/- डिमांड ड्राफ्ट/ इंडियन पोस्टल ऑर्डर )

**१३. अनुसूचित जमातीच्या उमेदवारांनी त्यांच्या जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच त्यांना नेमणूक देण्यात येईल.**

१४. तसेच रा.प.महामंडळाने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे / स्विकारणे इत्यादीचा अधिकार दिलेला नाही, याची नोंद घ्यावी.

१५. जर एखाद्या उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्याचे किंवा तोतया व्यक्तीची व्यवस्था केल्याचे आढळल्यास त्याला / तिला भरतीप्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यातून अथवा निवडीतून अपात्र ठरविण्यात येईल.

१६. कोणताही अर्ज कोणतेही कारण न देता नाकारणे वा स्विकारणे किंवा सदर जाहिरात पूर्णतः वा अंशतः रद्द करण्याचे अधिकार महामंडळ राखून ठेवत आहे.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)